जा.क्र.पोआ/कक्ष—११(६)/4300/२०२१
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई
दिनांकः— 13/११/२०२१

## आदेश

## पोलीस आयुक्त कार्यालय/पोलीस भरती—२०१९ /८१२(१)/२०२१

विषय :— फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१)(३) प्रमाणे मनाई आदेश

(१) ज्या अर्थी मुंबई शहर पोलिस शिपाई भरती—२०१९ लेखी परिक्षा मुंबई शहरातील विविध शाळांच्या परिक्षा केद्रांवर घेण्यात येत आहे. परिक्षेदरम्यान परिक्षा केंद्रांच्या आसपास गैरप्रकार टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे.

(२) त्याअर्थी मी चैतन्या एस. पोलीस उप आयुक्त, (अभियान), मुंबई शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि. ०१/०४/१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी, म्हणुन मुंबई शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौ.दं.प्र.सं. १४४ (१९७३ चे कलम २) अन्वये दिनांक १४/११/२०२१ रोजी सकाळी ०८.०० वाजलेपासुन ते २०.०० वा.पर्यंत परिक्षा केंद्रावर, केंद्राच्या आसपास सार्वजनिक ठिकाणी माणसे परिक्षा केंद्रावर न जमविणे, परिक्षा केंद्रामध्ये मोबाईल फोन व त्या संबंधी इलेक्ट्रॉनिक साहीत्य घेवून जाण्यास प्रतिबंध करित आहे. सदर आदेश हे पोलीस आयुक्त बृहन्मंबई यांचे कार्यक्षेत्रात लागु राहतील.

(३) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ व प्रचलित कायद्यान्वये शिक्षेस पात्र राहिल.

(४) सर्व संबंधितांना आदेशपुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौ.दं.प्र.सं. १९७३ चे कलम १४४ (२ ) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय, पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक १३/११/२०२१ रोजी दिलेला आहे.

DY. COMMISSIONER OF POLICE (OPERATIONS) BRIHAN MUMBAI
सत्यमेव जयते

(चैतन्या एस.)
पोलीस उप आयुक्त (अभियान)
तथा
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
बृहन्मुंबई

ठिकाण :— मुंबई
दिनांक : — 13/११/२०२१